पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.



# ठरलं! रविवारी महामुकाबला

## बांगलादेश पराभूत; भारत-पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना

**दुबई । वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सुपर फोरमधील लढतीत पाकिस्तानच्या संघाने बांगलादेशाला ११ धावांनी पराभूत करत अंतिम फेरीचे तिकीट पक्के केले. आता रविवारी (दि.२८) आशिया चषक स्पर्धेत तिसऱ्यांदा भारत-पाक यांच्यातील महामुकाबला पाहायला मिळेल. आशिया चषक स्पर्धेच्या आतापर्यंतच्या ४१ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच या स्पर्धेत भारत-पाक यांच्यात लढत होणार आहे.



आशिया चषक २०२५

दुबईच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा गोलंदाजी करताना बांगलादेशाच्या संघाने पाकच्या आघाडीच्या फलंदाजांना धक्क्यावर धक्के दिले. धावफलकावर ५० धावा लागण्याआधी पाकिस्तानचा अर्धा संघ तंबूत परतला होता. मोहम्मद हारिस ३१ (२३), शाहीन शाह आफ्रिदी १९ (१३), मोहम्मद नवाझ २५ (१५) आणि फहिमने ९ चेंडूत केलेल्या नाबाद १४ धावांच्या खेळीच्या जोरावर पाकिस्तानच्या संघाने निर्धारित २० षटकांत १३५ धावा करत बांगलादेशाला १३६ धावांचे लक्ष्य दिले. बांगलादेश संघाकडून टसकीन अहमदने ३ बळी घेत टी-२० क्रिकेट सामन्यातील १०० बळी पूर्ण केले. मेहदी हसन आणि रिशाद हुसेनने २ गडी बाद केले.



पाकिस्तानने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना परवेझ इमॉनच्या रूपात बांगलादेशच्या संघाने पहिल्याच षटकात विकेट गमावली. पाकिस्तानच्या संघाप्रमाणे बांगलादेशच्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांनीही नांगी टाकली. संघ अडचणीत असताना शमीन हुसेन याने बांगलादेशच्या आशा पल्लवित केल्या. पण १७ व्या षटकात शाहीन शाह आफ्रिदीच्या गोलंदाजीवर तो रिव्हर्स स्विप मारण्याच्या नादात २५ चेंडूत ३० धावा करून माघारी फिरला अन् मॅच पाकिस्तानच्या बाजूने फिरली. बांगलादेश संघाला २० षटकांत ९ बाद १२४ धावा काढता आल्या. बांगलादेश संघाकडून सैफ हुसेन १८, शमीम हुसेन ३० नुरूल हुसेन १६ धावा केल्या. पाकिस्तान संघाकडून शाहीन आफ्रिदी आणि हॅरिस रौफने प्रत्येकी तीन, सईम आयुबने दोन गडी बाद केले.

# भारत - श्रीलंका आज भिडणार

**दुबई । वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी (दि.२६)भारत आणि श्रीलंका संघांमध्ये दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुपर ४ चा शेवटचा सामना खेळविण्यात येणार आहे.

श्रीलंका संघाचे कर्णधारपद चरीत असलंकाकडे तर सूर्यकुमार यादवकडे भारतीय संघाचे कर्णधारपद असणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ८.०० वाजता सामना खेळविण्यात येणार आहे. श्रीलंका क्रिकेट संघाने साखळी फेरीच्या सामन्यात बांगलादेश, अफगाणिस्तान, हाँगकाँग विरूध्द विजय संपादन करून सुपर ४ मध्ये थाटात प्रवेश निश्चित केला होता. मात्र, सुपर ४ मध्ये सलामी सामन्यात श्रीलंका विरूध्द बांगलादेशने ४ गडी राखून तसेच पाकिस्तानने ५ गडी राखून विजय संपादन केल्यामुळे श्रीलंका संघाचे अंतिम फेरीचे स्वप्न भंगले आहे. त्यामुळे सुपर ४ मध्ये अखेरचा सामना जिंकून विजयी शेवट करण्यासाठी श्रीलंका मैदानावर उतरणार आहे.

दुसरीकडे भारतीय क्रिकेट संघाने सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना साखळी फेरीत ओमान विरूध्द २१ तसेच पाकिस्तान विरुद्ध ७ गडी राखून आणि संयुक्त अरब अमिरती विरूध्द १० गडी राखून साखळी फेरीत विजय संपादन केला होता.भारतीय संघाने आपली विजयी परंपरा कायम ठेवताना पाकिस्तान विरुद्ध ६ गडी राखून आणि बांगलादेश विरूध्द ४१ धावांनी विजय संपादन करून अंतिम सामन्यात आपला प्रवेश निश्चित केला आहे. त्यामुळे आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यापूर्वी भारत संघातील प्रमुख खेळाडूंना विश्रांती देऊन रिंकूसिंग, रियान पराग, यशस्वी जयस्वाल, हर्षित राणा या खेळाडूंना आजमावून पाहण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात

### राष्ट्रीय स्पर्धेत अद्विकाला कांस्य



**नाशिक ।** शिर्डी येथे झालेल्या सीबीएससी राष्ट्रीय जिम्नॅस्टिकस स्पर्धेत नाशिकच्या प्रबोधन इंटरनॅशनल जिम्नॅस्टिक्स ट्रेनिंग सेंटरची खेळाडू अद्विका प्रवीण जाधव हिने सुंदर खेळाचे प्रदर्शन करून कांस्य पदक पटकावले. जिम्नॅस्टिक्सच्या अनइव्हन बार या प्रकारात अद्विकाने हे यश संपादन केले आहे. अद्विका ही कॅफोर्ड इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी असून, ती गेल्या पाच वर्षांपासून गंगापूर रोड येथील प्रबोधन इंटरनॅशनल जिम्नॅस्टिक्स ट्रेनिंग सेंटरमध्ये एनआयएस प्रशिक्षक प्रबोधन डोणगांवकर यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे.

### अश्विन बिग बॅशमध्ये



**मुंबई ।** आंतरराष्ट्रीय क्रिकेट तसेच आयपीएल क्रिकेट स्पर्धेतून निवृत्ती जाहीर केल्यानंतर आर. अश्विन आता ऑस्ट्रेलियामधील बिग बॅश टी-२० लीगमध्ये आपला जलवा दाखविण्यासाठी सज्ज झाला आहे. आर. अश्विन बिग बॅश लीग क्रिकेट स्पर्धेमध्ये खेळणारा पहिला भारतीय खेळाडू असून सिडनी थंडर्स संघाकडून खेळताना दिसणार आहे.आर. अश्विनने 'एक्स' पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. आर. अश्विन एक अष्टपैलू खेळाडू असून, गोलंदाजीप्रमाणे फलंदाजीमध्ये महत्वपूर्ण योगदान देण्यासाठी सक्षम आहे.

# ऑस्ट्रेलिया 'अ' विरुद्ध मालिकेसाठी अय्यर कर्णधार

**कानपूर । वृत्तसंस्था**



भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया 'अ' संघांमध्ये लखनौ येथील अटल बिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर २ अनधिकृत कसोटी क्रिकेट सामन्यांची मालिका खेळविण्यात येत आहे. ही मालिका आटोपल्यानंतर ३० सप्टेंबरपासून कानपूर येथील ग्रीन पार्क स्टेडियमवर उभय संघांमध्ये ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मालिकेसाठी भारतीय 'अ' संघाचे कर्णधारपद श्रेयस अय्यरकडे तर तिलक वर्माकडे उपकर्णधारपद असणार आहे. भारतीय संघ सध्या दुबईत आशिया चषक क्रिकेट स्पर्धा खेळत आहे. भारतीय संघाकडून तिलक वर्मा खेळत असल्यामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात तो उपकर्णधार म्हणून मैदानावर आहे. अय्यरने भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया 'अ' संघांमध्ये खेळविण्यात आलेल्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाचे कर्णधारपद भूषविले होते. मात्र, लाल चेंडूच्या सामन्यातून ब्रेक घेतला होता. अय्यर पुढील ६ महिने मर्यादित षटकांचे सामने खेळणार असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने स्पष्ट केले आहे.

**पहिल्या सामन्यासाठी संघ:** श्रेयस अय्यर, रियान पराग, प्रभसिमरनसिंग, सुयांश शेडगे, आयुष बदोनी, निशांत सिंधू, विपराज निगम, गुर्जनपनित सिंग, रवी बिश्नोई, अभिषेक पोरेल, युधवीर सिंग, सिमरजित सिंग, प्रियांश आर्या.

**दुसऱ्या सामन्यासाठी संघ:** श्रेयस अय्यर, तिलक वर्मा, अभिषेक शर्मा,रियान पराग, प्रभसिमरनसिंग,आयुष बदोनी, सुयांश शेडगे,निशांत सिंधू, विपराज निगम, गुर्जनपनित सिंग, युधवीर सिंग,रवी बिश्नोई, अभिषेक पोरेल, हर्षित राणा, अर्शदिपसिंग

# विंडीजविरुद्ध कसोटीसाठी गिलकडे भारताचे नेतृत्त्व

**मुंबई । वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध वेस्ट इंडिज संघांमध्ये २ ऑक्टोबरपासून २ सामन्यांची कसोटी मालिका खेळविण्यात येणार आहे. या मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. संघाचे कर्णधारपद शुभमन गिलकडे असणार आहे.

निवड समितीने जाहीर केलेल्या भारतीय संघात अनेक बदल झाल्याचे पहायला मिळाले आहे. संघाचे उपकर्णधारपद रवींद्र जडेजाकडे असणार आहे. डाव्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्रस्त असल्यामुळे ऋषभ पंतला विश्रांती देण्यात आली आहे. इंग्लंड दौऱ्यात निराशाजनक कामगिरी केल्यानंतर करूण नायरला वगळण्यात आले आहे.

तसेच, देवदत्त पडिकल संघात परतला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी केल्यानंतर यष्टीरक्षक फलंदाज नारायण जगदीशनची बॅकअप यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. जलदगती गोलंदाजीची भिस्त महंमद सिराज, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा यांच्यावर असणार आहे.

**भारतीय संघ असा :** शुभमन गिल (कर्णधार) के. एल. राहुल, यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, देवदत्त पडिकल, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक) नारायण जगदीशन, (यष्टीरक्षक नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा (उपकर्णधार), वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, महंमद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, कुलदीप यादव

MARUTI SUZUKI ARENA

उत्सवाचा आनंद
आता झाला अजून मोठा!

GST लाभ आणि मर्यादित कालावधी फेस्टिव्ह ऑफर्ससोबत

30 सप्टेंबर, 2025 पर्यंत वैध

| MODEL | S-PRESSO | ALTO K10 | CELERIO | WAGONR | SWIFT | DZIRE | BREZZA | ERTIGA | EECO |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| REDUCTION IN PRICE^ (₹) UP TO | 129 600 | 107 600 | 94 100 | 79 600 | 84 600 | 87 700 | 112 700 | 46 400 | 68 000 |
| NOW STARTING AT^ (₹) | 349 900 | 369 900 | 469 900 | 498 900 | 578 900 | 625 600 | 825 900 | 880 000 | 518 100 |
| ADDITIONAL FESTIVE OFFERS* (₹) UP TO | 62 500 | 67 500 | 67 500 | 82 500 | 67 500 | - | 50 000 | - | 42 500 |

BOOK NOW
UP TO 100% PROCESSING FEE WAIVER ON CAR FINANCE#



ARENA SAFETY SHIELD

SCAN TO CONNECT TO SHOWROOM NEAR YOU

E-BOOK TODAY AT WWW.MARUTISUZUKI.COM

Contact us at 1800-102-1800

T&C available at dealership. Features/accessories vary by variant. Black glass shade on the vehicle is due to lighting effect. *Offers / Prices differ by variant/model/location/city and may change or end without notice. Includes consumer, exchange, and institutional/rural offers (where applicable) on select models. Offer values shown are maximums. Prices subject to GST rates as notified by the Government. ^Reductions and starting prices vary by variant. #Valid with select financiers, for personal-use vehicles only.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : * **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६.
● Mail id : ceditor@deshdoot.com

cmyk